# १. गरजाधिष्ठित उपक्रम

## १. संस्कृती आणि कार्यजगताची ओळख

**माहिती स्रोत** (वृत्तपत्र, आकाशवाणी, दूरदर्शन, इंटरनेट)





(१) वृत्तपत्रातील बातम्यांचा संग्रह करणे.

(२) आकाशवाणीवरील बातम्या ऐकून त्या मित्रांना सांगणे.

(३) दूरदर्शनवरील बातम्या पाहणे किंवा ऐकणे आणि आवडत्या विषयावरील बातमीचे लेखन करणे.

- **बातम्यांचे प्रकार**

  सांस्कृतिक, माहितीपर, पर्यावरणपूरक, शैक्षणिक, विज्ञानविषयक; मनाला आनंद, स्फूर्ती आणि उत्साह देणाऱ्या बातम्या.

**माझी कृती :**

(१) निवडलेल्या बातम्या एकमेकांना सांगणे किंवा वाचून दाखवणे.
(आवाज, उच्चार आणि वेग यांचा वापर करणे.)

(२) शाळेच्या फलकावरील माहितीचे वाचन केले आहे काय?

(३) आवडलेली कोणतीही एक माहिती अथवा बातमी वहीत लिहा.

◆ माहिती स्रोत म्हणजे काय? याविषयी माहिती द्यावी. प्रत्येकाला एखादी बातमी अथवा माहिती सांगण्याची संधी द्यावी. बातमी आणि अफवा यातील फरक सांगावा.

# २. जलसाक्षरता

## २.१ पाण्याचे उपयोग

पाणी म्हणजे जीवन. सजीवांना पाण्याची गरज असते. विविध कामांसाठी पाण्याचा वापर होतो. वर्षभरात लागणारे पाणी हे केवळ पावसाळ्याच्या चार महिन्यांत मिळते. हे पाणी वर्षभर उपलब्ध व्हावे म्हणून पाण्याचा वापर योग्य रितीने व नियोजनबद्ध करणे गरजेचे आहे.



**माझी कृती :**

पाण्याशी संबंधित म्हणी आणि घोषवाक्ये तयार करा व योग्य ठिकाणी लावा.

**जागतिक जलदिनाविषयी अधिक माहिती मिळवा.**




- 'पाण्याचे उपयोग' याविषयी चित्रवाचन घेऊन चर्चा करा. चित्रातील **चुकीच्या गोष्टी** कोणत्या? त्यासाठी काय करणे अपेक्षित आहे हे विचारावे. पाण्याचा नियोजनबद्ध वापर करण्यासाठी काय काय करता येईल याविषयी चर्चा करा. पाणी काटकसरीने कसे वापरता येईल यासाठी 'माझी पाणी बचत बँक' हा उपक्रम राबवावा.

## २.२ पाणी शुद्ध करण्याच्या पद्धती

आरोग्यासाठी शुद्ध पाणी आवश्यक आहे. जे पाणी पिण्यासाठी वापरतो ते डोळ्यांना स्वच्छ दिसले तरी ते शुद्ध असतेच असे नाही. शुद्ध पाण्याला कोणताही वास किंवा रंग नसतो. ज्यात अपायकारक रोगजंतू, रसायने, पालापाचोळा किंवा क्षारांचे प्रमाण अधिक आहे असे पाणी अशुद्ध असते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

अशुद्ध पाण्यामुळे अनेक गंभीर आजार होतात. उदा; पोटाचे विकार, कावीळ, साथीचे आजार इत्यादी. म्हणूनच पिण्याचे पाणी शुद्ध करून पिणे अत्यंत गरजेचे आहे.

- **पाणी शुद्ध करण्याच्या काही घरगुती पद्धती**

(१) **निवळणे :** गढूळ पाण्यात तुरटी फिरवून पाणी स्थिर ठेवावे म्हणजे त्यातील गाळ खाली बसतो.

(२) **गाळणे :** पाणी स्वच्छ चौपदरी कापडातून गाळून घेणे.

(३) **उकळणे :** गाळून घेतलेले पाणी उकळून थंड करून घ्यावे.



निवळणे



गाळणे



उकळणे

**माझी कृती :**

(१) अशुद्ध पाण्यामुळे होणाऱ्या आजारांची माहिती घ्या.

(२) घरातील पाणी शुद्ध करण्यासाठी कोणती पद्धत वापराल ?

(३) खालील कृती करून पहा.



गढूळ पाणी निवळणे तुरटी फिरवणे गाळणे

- परिसरातील जलशुद्धीकरण केंद्राच्या भेटीचे आयोजन करा.

# ३. आपत्ती व्यवस्थापन

**‘आपत्ती म्हणजे संकट व व्यवस्थापन म्हणजे योग्य नियोजन’.**

- **आपत्तींचे प्रकार :**

(१) निसर्गनिर्मित आपत्ती (२) मानवनिर्मित आपत्ती

### (१) निसर्गनिर्मित आपत्ती

भूकंप, वादळ, महापूर, वणवा, दुष्काळ या नैसर्गिक आपत्ती आहेत. आपत्ती व्यवस्थापनामुळे आपत्तीला रोखून किंवा आपत्तीचा परिणाम कमी करून मानवी जीवन सुलभ करता येते.

### (२) मानवनिर्मित आपत्ती

मानवनिर्मित आपत्ती या मानवाच्या बेजबाबदारपणा आणि निष्काळजीपणा यांसारख्या कारणांमुळे ओढवतात. म्हणून या आपत्तींना मानवनिर्मित आपत्ती असे म्हणतात. उदा. वाहतुकीचे नियम न पाळणे, भरधाव वाहने चालवणे, पाणी वाया घालवणे; पंखे, दिवे आणि नळ बंद न करणे.







चित्रवाचन





**माझी कृती :** गर्दीच्या ठिकाणी कोणती काळजी घ्याल ते सांगा.

- आपत्ती व्यवस्थापन याविषयी चित्रवाचन घेऊन चर्चा करा. चित्रातील प्रसंगी काय करणे अपेक्षित आहे हे विचारावे. मानवनिर्मित आपत्ती टाळण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी हे समजावून द्यावे.